मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 13 सप्टेंबर 2026 | पान - 1

# बाप्पा घडवताना विद्यार्थ्यांनी जपला निसर्ग!

## भोसरीतील एसपीजी स्कूलमध्ये पर्यावरणपूरक गणेशमूर्ती; जलप्रदूषणमुक्त गणेशोत्सवाचा संदेश

» पिंपरी | प्रतिनिधी

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्लास्टर ऑफ पॅरिस (POP) आणि रासायनिक रंगांमुळे होणारे जलप्रदूषण रोखण्यासाठी भोसरी येथील एसपीजी स्कूलमध्ये एका विशेष 'इको-फ्रेंडली गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत शाळेतील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने सहभाग नोंदवून स्वतःच्या हाताने नैसर्गिक शाडूच्या मातीपासून सुबक बाप्पाच्या मूर्ती साकारल्या. बाजारातील रासायनिक मूर्ती आणण्याऐवजी स्वतः मूर्ती घडवताना विद्यार्थ्यांमध्ये एक वेगळाच आनंद आणि उत्साह पाहायला मिळाला.**







तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या देखरेखीखाली पार पडलेल्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी माती मळण्यापासून ते मूर्तीला रेखीव आकार देण्यापर्यंतचे सर्व बारकावे व तंत्र आत्मसात केले. शाडूच्या मातीचा सुयोग्य वापर करत चिमुकल्या हातांनी गणरायाच्या मनमोहक आणि आकर्षक मूर्ती घडवल्या. या मूर्तींना रंगवण्यासाठी केवळ नैसर्गिक व जलद्रव्य (वॉटर कलर) रंगांचा वापर करण्यात आला, जेणेकरून विसर्जनाच्या वेळी पाण्याचे कोणतेही प्रदूषण होणार नाही. गणेशोत्सव हा आपली संस्कृती आणि श्रद्धेचा सण असला, तरी तो साजरा करताना निसर्गाचे रक्षण करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे, हीच भावना विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी यावेळी व्यक्त केली. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी केवळ मूर्ती बनवण्याची कलाच शिकून घेतली नाही, तर 'माझा निसर्ग, माझी जबाबदारी' मानत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा ठाम संकल्पही केला. शाळेच्या मुख्याध्यापकांनी व व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांच्या या कल्पकतेचे आणि सुंदर कलाकृतींचे मनापासून कौतुक केले.

विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या या लाडक्या बाप्पाची प्रतिष्ठापना ते आपल्या घरात करणार आहेत. उत्सवानंतर घरातच बादलीत किंवा कुंडीत या मूर्तींचे विसर्जन करून ती माती झाडांसाठी खत म्हणून वापरली जाणार आहे. केवळ घोषणा न देता प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरण संवर्धनाचा मोलाचा संदेश देणाऱ्या एसपीजी स्कूलच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून भरभरून कौतुक होत आहे.

# देहू–आळंदी मेट्रोला गती द्या! प्रभागाच्या प्रश्नांसाठी उपमुख्यमंत्र्यांकडे ठोस मागणी

» पिंपरी | प्रतिनिधी

**देहू–आळंदी प्रस्तावित मेट्रो मार्गाला गती मिळावी, तसेच प्रभागातील विविध विकासकामे, पायाभूत सुविधा आणि नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांची तातडीने सोडवणूक व्हावी, यासाठी महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांची पुणे येथे सदिच्छा भेट घेण्यात आली. यावेळी विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर करून संबंधित प्रश्नांवर शासनस्तरावर सकारात्मक कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.**



देहू ते आळंदी हा प्रस्तावित मेट्रो मार्ग या परिसराच्या भविष्यातील विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. परिसरातील वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढती संख्या आणि त्यातून निर्माण होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता, नागरिकांना सक्षम, जलद आणि सुलभ सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध होण्यासाठी हा मेट्रो प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे या प्रस्तावित मार्गाला शासनस्तरावर आवश्यक ती गती मिळावी, यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

मेट्रो प्रकल्पासोबतच प्रभागातील विविध विकासकामे आणि पायाभूत सुविधांशी संबंधित प्रश्नांवरही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. रस्ते, वाहतूक व्यवस्था, मूलभूत नागरी सुविधा, पायाभूत विकास तसेच नागरिकांच्या विविध प्रलंबित समस्या याबाबत संबंधित मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. प्रभागाच्या वाढत्या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विकासकामांना गती देण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

“नागरिकांच्या समस्या सोडविणे आणि प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करणे, हीच माझी भूमिका आहे. देहू–आळंदी मेट्रोसह प्रभागातील विविध विकासकामांना गती मिळावी आणि नागरिकांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी यापुढेही प्रामाणिकपणे प्रयत्नशील राहणार आहे,” अशी भूमिका यावेळी व्यक्त करण्यात आली.

या भेटीदरम्यान प्रभागातील प्रश्न थेट शासनाच्या वरिष्ठ पातळीवर मांडण्यात आल्याने आगामी काळात संबंधित विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. विशेषतः देहू–आळंदी मेट्रो प्रकल्पामुळे या भागातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यासोबतच भविष्यातील वाहतूक कोंडी कमी करण्यास मदत होऊ शकते.

# वडगाव मावळातील बेकायदेशीर उत्खननाविरोधात तृप्ती देसाई आक्रमक!

## रामदास काकडेंसह संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाईची मागणी!

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**वडगाव मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आणि शेकडो एकर जमिनीवरील बेकायदेशीर उत्खननाविरोधात सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी आक्रमक पवित्रा घेत आज पत्रकार परिषदेत अत्यंत खळबळजनक आरोप केले. भाजप पदाधिकारी रामदास काकडे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावून, बोगस दाखल्यांच्या आधारे बेकायदेशीर उत्खनन करत शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवल्याचा थेट आरोप त्यांनी केला. जांभळे परिसरातील शेतकरी विष्णू अंभोरे आणि त्यांच्या ८५ वर्षीय आजी आनंदीबाई अंभोरे यांची सुमारे ५० एकर वडिलोपार्जित जमीन असून, भूमाफियांनी येथील शेती आणि शेततळे पूर्णपणे उद्ध्वस्त केली आहेत. चार दिवसांपूर्वी जेव्हा या शेतकऱ्यांनी पुण्यात येऊन आपली आपबिती सांगितली, तेव्हा परिस्थितीची भीषणता समोर आल्याचे सांगत देसाई यांनी प्रत्यक्ष घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर पत्रकार परिषद घेऊन प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र ताशेरे ओढले.**



शासकीय नियमांनुसार कमाल सहा मीटर म्हणजेच १८ ते २० फुटांपर्यंतच उत्खननाची परवानगी असताना, प्रत्यक्षात या ठिकाणी २५० ते ३०० फूट खोल उत्खनन करण्यात आले आहे. ज्या जमिनीवर हे शेतकरी भात आणि वरीची शेती करत होते, ती जमीन वनीकरणाची असताना तिथे उत्खननाची परवानगी मिळालीच कशी, असा संतप्त सवाल देसाई यांनी उपस्थित केला. या वनीकरणाच्या जागेचे बोगस दाखले तयार करून, स्थानिक शेतकऱ्यांची कोणतीही संमती न घेता हा संपूर्ण गैरप्रकार सुरू आहे. इतकेच नव्हे तर, जवळून जाणाऱ्या हायटेन्शन वीज वाहिनीच्या ५०० मीटर परिसरात काम करण्यास मनाई असताना, अगदी खांबांलगत मोठ्या प्रमाणावर खोदकाम करण्यात आले असून त्यामुळे तिथे धोकादायक तडे गेले आहेत. जून महिन्यात शेतकऱ्यांनी तक्रारी दाखल केल्यानंतर, स्वतःचे गुन्हे लपवण्यासाठी आणि कारवाई टाळण्यासाठी आता रात्रीच्या वेळी पाचशेहून अधिक गाड्या लावून हे खड्डे बुजवण्याचे काम प्रशासनाला हाताशी धरून युद्धपातळीवर सुरू असल्याचा पर्दाफाशही त्यांनी केला.

गरीब शेतकऱ्यांनी जेव्हा जेव्हा या अन्यायाविरोधात आवाज उठवला, तेव्हा त्यांच्या घरावर दगडफेक करण्यात आली, दरोडे टाकण्यात आले आणि त्यांना थेट जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या. तक्रार दडपण्यासाठी ८५ वर्षांच्या वृद्ध आजींना चक्क ५०० कोटी ते १५०० कोटी रुपयांच्या अब्रुनुकसानीच्या धमक्यांच्या नोटिसा पाठवून मानसिक छळ केला जात आहे. आपण सत्तेत आहोत आणि आपले कोणीच काही बिघडवू शकत नाही या तोऱ्यात भाजप पदाधिकारी रामदास काकडे वागत असून, जाब विचारणाऱ्या शेतकऱ्यांना 'मुख्यमंत्री आणि महसूल मंत्र्यांपर्यंत आमचे पैसे पोहोचले आहेत' अशी उर्मट उत्तरे दिली जात असल्याचा गंभीर आरोप देसाई यांनी केला. स्वतःच्या गुन्ह्यांवर पांघरूण घालण्यासाठी मुख्यमंत्री आणि महसूल मंत्र्यांचे नाव बदनाम करणाऱ्या या भूमाफियांवर तात्काळ कारवाई करण्याचे आव्हान त्यांनी शासनाला दिले.

या संपूर्ण गैरव्यवहारात स्थानिक महसूल आणि पोलीस प्रशासनाची भूमिका संशयास्पद असल्याचा दावा करत तृप्ती देसाई यांनी अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीचे वाभाडे काढले. तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, गौण खनिज विभाग आणि तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष पुरावे, फोटो आणि व्हिडिओसह वारंवार तक्रारी देऊनही कोणतीही कारवाई झालेली नाही. शेतकऱ्यांच्या घरावर हल्ला झाल्यावर '११२' वर कॉल करूनही पोलिसांनी गुन्हा दाखल केला नाही. स्वतः फोन केला असता तहसीलदार मुंबईत असल्याचे सांगतात तर पोलीस निरीक्षक बंदोबस्ताचे कारण पुढे करतात, यावरून पोलीस ठाणी केवळ श्रीमंत भूमाफियांचे खिसे भरण्यासाठी आणि त्यांना संरक्षण देण्यासाठीच काम करत आहेत का, असा संतप्त सवाल त्यांनी केला.

केवळ जांभळेच नव्हे तर पवना मावळ, नाणे मावळ आणि आंदर मावळ या संपूर्ण परिसरात अशाच प्रकारे बेकायदेशीर उत्खननाचे रॅकेट सुरू आहे. त्यामुळे केवळ तात्पुरते काम न थांबवता, शेतकरी अंभोरे यांच्या तक्रारीच्या आधारे रामदास हिरामन काकडे, रणजीत काकडे, मयूर काकडे, किरण काकडे, युवराज काकडे आणि त्यांच्या इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीसह, त्यांना आर्थिक लाभापोटी साथ देणारे तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालयातील जबाबदार अधिकारी व गौण खनिज अधिकाऱ्यांवर तत्काळ संगनमताने फसवणूक केल्याप्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांची रवानगी तुरुंगात करावी, अशी ठाम मागणी तृप्ती देसाई यांनी केली. जोपर्यंत पीडित शेतकऱ्यांना पूर्ण न्याय मिळत नाही, तोपर्यंत हा लढा अधिक तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

# बाप्पासोबत निसर्गही जपला; विद्यार्थ्यांनी दिला हरित गणेशोत्सवाचा संदेश!

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**पर्यावरण संवर्धनाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासोबतच गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने शहराच्या विविध भागांत जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून 'स्वच्छ सर्वेक्षण २०२६' आणि 'माझी वसुंधरा ७.०' अभियानांतर्गत 'ग' क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग क्रमांक २३ मधील यशवंतराव चव्हाण विद्यालय, थेरगाव येथे विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी शाडू माती व नैसर्गिक साहित्याचा वापर करून गणेशमूर्ती साकारत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश दिला.**





महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाकडून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत शहरात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि नागरिकांच्या सहभागाचा संदेश देण्यावर महापालिकेचा भर आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शाडू माती तसेच नैसर्गिक साहित्याचा वापर करून गणेशमूर्ती तयार केल्या तसेच, यावेळी पुनर्वापर करता येणाऱ्या साहित्यापासून सजावट करण्याचे आवाहन करण्यात आले. कागद, कापड, बांबू, पाने आणि नैसर्गिक फुलांचा वापर करून सजावट करण्यास प्रोत्साहन देण्यात आले. तसेच थर्माकोल आणि एकदा वापरून फेकून देण्यात येणाऱ्या प्लास्टिकचा वापर टाळण्याबाबत विद्यार्थी व शिक्षकांमध्ये जनजागृती देखील करण्यात आली.

"गणेशोत्सव हा श्रद्धा, संस्कृती आणि उत्साहाचा सण आहे. हा उत्सव साजरा करताना पर्यावरणाचे संवर्धन करण्याची जबाबदारीही आपली आहे. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती, नैसर्गिक सजावट आणि प्लास्टिकमुक्त उत्सवाचा संदेश घराघरांत पोहोचण्यास मदत होईल. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक सवयी रुजल्यास त्याचा सकारात्मक परिणाम पुढील पिढीवरही होईल," असे उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

यावेळी सहा.आरोग्य अधिकारी अतुल सोनवणे, आरोग्य निरीक्षक गोपाल धस, आरोग्य सहाय्यक सचिन उघडे तसेच मुख्याध्यापक शिवाजी दौंडकर हे देखील उपस्थित होते.

# पुनावळे बांधकाम परवानगी प्रकरणात दोन अभियंत्यांवर निलंबनाची कारवाई!

## प्रशमन शुल्कातील तफावतीने महापालिका प्रशासनात खळबळ; सोनवणे, मोरे निलंबित!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या बांधकाम परवानगी विभागातील पुनावळे येथील बांधकाम प्रकरणात प्रशमन शुल्काच्या आकारणीतील तफावतीवरून दोन अभियंत्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. कार्यकारी अभियंता (स्थापत्य) विजय पुंडलिक सोनवणे आणि उपअभियंता (स्थापत्य) अशोक श्रावण मोरे यांना महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी ११ सप्टेंबर २०२६ रोजी तात्काळ निलंबित केले. तसेच दोन्ही अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. याशिवाय सह शहर अभियंता सुनील भागवाणी आणि कार्यकारी अभियंता विजय सोनवणे यांच्याविरोधात उच्चस्तरीय चौकशीचे आदेश देण्यात आल्याची माहिती मिळत आहे.**




पुनावळे येथील काही भूखंडांवर निवासी तसेच वाणिज्य इमारतींच्या बांधकामांना महापालिकेकडून परवानगी देण्यात आली होती. संबंधित बांधकामांना भोगवटा प्रमाणपत्र देताना आकारण्यात येणाऱ्या प्रशमन शुल्काच्या अनुषंगाने सुरुवातीला ‘प्रपत्र अ’ तयार करण्यात आले. त्यानंतर प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून इमारतीच्या बांधकामाची तपासणी करण्यात आली आणि शुल्काची पुनर्गणना करत ‘प्रपत्र ब’ तयार करण्यात आले.

मात्र, या दोन्ही प्रपत्रांमध्ये आकारण्यात आलेल्या प्रशमन शुल्काच्या एकूण रकमेत तफावत आढळून आली. या तफावतीबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर प्रशासनाने संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावत खुलासा मागविला.

कार्यकारी अभियंता विजय सोनवणे यांनी दिलेल्या खुलाशात प्रशमन शुल्काची सुरुवातीला एका पद्धतीने आकारणी करण्यात आली होती. त्यानंतर इमारतीच्या प्रत्येक मजल्याची उंची विचारात घेऊन शुल्काची पुनर्गणना करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र, दोन्ही गणनांमधील रकमेत तफावत नेमकी का निर्माण झाली, याबाबत समर्पक स्पष्टीकरण देता आले नसल्याचे विभागप्रमुखांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांचा खुलासा प्रशासनाच्या दृष्टीने समाधानकारक ठरला नाही.

उपअभियंता अशोक मोरे यांच्या बाबतीतही याच स्वरूपाची प्रक्रिया झाल्याचे समोर आले. त्यांच्या खुलाशानुसार प्रशमन शुल्काची प्रथम एका पद्धतीने आकारणी करण्यात आली आणि त्यानंतर इमारतीच्या मजल्यांची उंची विचारात घेऊन शुल्काची पुनर्गणना करण्यात आली. मात्र, या दोन्ही प्रक्रियांमध्ये निर्माण झालेल्या शुल्कातील तफावतीबाबत समाधानकारक स्पष्टीकरण देण्यात आले नसल्याचे निलंबन आदेशात नमूद करण्यात आले आहे.

या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. दोन्ही अभियंत्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३(१) मधील संबंधित तरतुदींचा भंग केल्याच्या निष्कर्षाप्रत प्रशासन आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमांतील तरतुदींनुसार विजय सोनवणे आणि अशोक मोरे यांना तात्काळ निलंबित करण्यात आले. निलंबनाच्या काळात दोन्ही अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी करण्यात येणार असून, या प्रकरणातील जबाबदारी निश्चित करण्यासाठी प्रशासनाकडून पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणात केवळ दोन अभियंत्यांवरच कारवाई न थांबता वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही चौकशी होण्याची शक्यता आहे. सह शहर अभियंता सुनील भागवाणी आणि कार्यकारी अभियंता विजय सोनवणे यांच्याविरोधात उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिल्याची माहिती समोर आल्याने महापालिका बांधकाम परवानगी विभागात खळबळ उडाली आहे.

प्रशमन शुल्काच्या आकारणीतील तफावत नेमकी कशी निर्माण झाली, त्यासाठी कोणाची जबाबदारी निश्चित होणार आणि या प्रकरणात आणखी कोणावर कारवाई होणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# काळ्या काचा, फॅन्सी नंबर प्लेट; पिंपरीत थारवर पोलिसांचा दणका!

» पिंपरी | प्रतिनिधी

**वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरोधात पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून, काळ्या काचा आणि नियमबाह्य फॅन्सी नंबर प्लेट लावून फिरणाऱ्या महिंद्रा थार कारवर कारवाई करण्यात आली आहे. पिंपरी वाहतूक पोलिसांनी एमएच १४ एलजे २५२५ क्रमांकाच्या थारची तपासणी करून ती ताब्यात घेतली आहे. या कारवाईमुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांमध्ये खळबळ उडाली आहे.**






मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित थार कारच्या काचांवर नियमानुसार परवानगी नसतानाही काळी फिल्म लावण्यात आली होती. वाहनाच्या काचांना अशा प्रकारे अनधिकृत फिल्म लावल्यामुळे कारच्या आतील भाग स्पष्टपणे दिसत नाही. त्यामुळे वाहनातील व्यक्तींची हालचाल, तसेच वाहनाच्या आतील परिस्थिती बाहेरून सहजपणे लक्षात येत नाही. वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने अशा प्रकारच्या अनधिकृत फिल्मचा वापर धोकादायक ठरू शकतो.

याशिवाय, संबंधित वाहनावर नियमबाह्य फॅन्सी नंबर प्लेट बसविण्यात आली होती. नंबर प्लेट ही वाहनाची अधिकृत ओळख असल्याने ती शासनाने निश्चित केलेल्या नियमांनुसार आणि निर्धारित नमुन्यात असणे आवश्यक आहे. मात्र, संबंधित थारवर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पद्धतीने नंबर प्लेट लावण्यात आल्याचे तपासणीदरम्यान आढळून आले. अशा प्रकारच्या नंबर प्लेटमुळे वाहनाची ओळख स्पष्टपणे पटण्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता असते.

वाहतूक पोलिसांनी वाहनाची तपासणी करताना या दोन्ही नियमभंगांची नोंद घेतली. त्यानंतर संबंधित वाहनचालकाविरोधात मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली असून वाहन ताब्यात घेण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करून रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांविरोधात वाहतूक विभागाकडून कठोर भूमिका घेतली जात असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या काही काळापासून वाहनांमध्ये करण्यात येणाऱ्या विविध अनधिकृत बदलांकडे वाहतूक पोलिसांचे विशेष लक्ष आहे. वाहनाच्या काचांना काळी फिल्म लावणे, नियमबाह्य किंवा फॅन्सी नंबर प्लेटचा वापर करणे, अनधिकृत सायरन बसविणे, बेकायदा फ्लॅश लाईट लावणे, वाहनाचा मूळ ढाचा बदलणे अशा प्रकारांवर पोलिसांकडून कारवाई केली जात आहे. वाहनचालकांनी केवळ आकर्षक दिसण्यासाठी किंवा वेगळेपणा दाखविण्यासाठी वाहनामध्ये नियमबाह्य बदल करू नयेत, असे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

काळ्या काचा आणि फॅन्सी नंबर प्लेटकडे केवळ ‘स्टाईल’ म्हणून पाहता येणार नाही. वाहनाच्या काचांवर अनधिकृत फिल्म असल्यास वाहनातील हालचाली बाहेरून दिसत नाहीत. त्यामुळे वाहतूक सुरक्षेबरोबरच कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीनेही अशा वाहनांची तपासणी महत्त्वाची ठरते. त्याचप्रमाणे नंबर प्लेट ही वाहनाची ओळख असल्याने तिच्यामध्ये कोणत्याही प्रकारे फेरफार करणे अथवा नियमबाह्य प्लेटचा वापर करणे प्रशासनाच्या कारवाईस पात्र ठरते.

दरम्यान, शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि वर्दळीच्या ठिकाणी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांना केवळ दंड करून सोडण्याऐवजी आवश्यकतेनुसार वाहन ताब्यात घेण्याची कारवाईही केली जात आहे. त्यामुळे वाहनचालकांनी रस्त्यावर वाहन चालविताना वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# गणरायाच्या स्वागतासाठी पुण्याच्या बाजारपेठा गजबजल्या!

## तुळशीबाग, लक्ष्मी रस्ता, मंडई, बोहरी आळीत खरेदीचा जल्लोष; पूजासाहित्याला मोठी मागणी!

» पिंपरी | प्रतिनिधी

**गणरायाच्या आगमनाची चाहूल लागताच पुण्यातील प्रमुख बाजारपेठांवर गणेशोत्सवाचा रंग चढला असून, खरेदीसाठी पुणेकरांची तुफान गर्दी उसळली आहे. तुळशीबाग, लक्ष्मी रस्ता, मंडई, रविवार पेठेतील बोहरी आळी यांसह शहरातील प्रमुख बाजारपेठा नागरिकांच्या गर्दीने फुलून गेल्या आहेत. सजावटीच्या आकर्षक वस्तूंनी सजलेली दुकाने, पूजेच्या साहित्याने भरलेले स्टॉल आणि खरेदीसाठी आलेल्या नागरिकांची लगबग यामुळे मध्यवर्ती पुण्याचा परिसर अक्षरशः गजबजून गेला आहे.**



शनिवारी (दि. १३) सुटीचा दिवस असल्याने सकाळपासूनच बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी नागरिकांची गर्दी वाढत गेली. गणरायाच्या स्वागताची तयारी काही कमी पडू नये, यासाठी पुणेकरांनी कुटुंबासह बाजारपेठांकडे धाव घेतली. घरातील गणपतीच्या सजावटीपासून पूजेच्या साहित्यापर्यंत आवश्यक असणाऱ्या विविध वस्तूंची खरेदी करण्यासाठी नागरिकांची लगबग सुरू होती. त्यामुळे बाजारपेठांमध्ये सर्वत्र उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

गणेशोत्सवासाठी आवश्यक असलेले पूजेचे साहित्य, फुले, हार, तोरणे, आरास करण्यासाठी लागणाऱ्या विविध वस्तू, समई, पणत्या, कापूर, उदबत्ती, हळद-कुंकू, अष्टगंध यांसह विविध साहित्य खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी झाली होती. मंडई परिसरात पूजेच्या साहित्याच्या खरेदीसाठी नागरिक मोठ्या संख्येने दाखल झाले होते. प्रत्येक दुकानात ग्राहकांची वर्दळ दिसत होती.

लक्ष्मी रस्ता आणि तुळशीबाग परिसरात विशेषतः गौरीपूजनासाठी लागणाऱ्या साहित्याच्या खरेदीसाठी महिलांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. विविध प्रकारच्या सजावटीच्या वस्तू, पूजेचे साहित्य आणि गौरीपूजनासाठी लागणाऱ्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी महिला मोठ्या संख्येने बाजारपेठेत आल्या होत्या. आपल्या घरातील आरास आणि सजावटीची संकल्पना डोळ्यासमोर ठेवून नागरिकांकडून वस्तूंची निवड केली जात होती.

रविवार पेठेतील बोहरी आळीमध्ये सजावटीच्या साहित्याची खरेदी करण्यासाठी नागरिकांची झुंबड उडाली होती. विविध प्रकारची तोरणे, फुलांच्या माळा, सजावटीच्या वस्तू आणि आरास साहित्य खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी झाली होती. तर शनिपार परिसरात मिठाई आणि विविध प्रकारच्या मोदकांच्या खरेदीसाठी नागरिकांची लगबग सुरू होती.

यंदा हरितालिका आणि श्री गणेश चतुर्थी एकाच दिवशी असल्याने पूजेच्या साहित्याला आणखी मागणी वाढली आहे. मंडई परिसरात हरितालिका पूजनासाठी आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी महिला आणि युवतींची मोठी गर्दी झाली होती. पूजेच्या साहित्याबरोबरच फुले, पत्री आणि इतर पूजाविधीच्या वस्तूंचीही मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आली.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मध्यवर्ती पेठांबरोबरच कॅम्प, खडकी, फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता, जंगली महाराज रस्ता, डेक्कन परिसर तसेच उपनगरांमधील बाजारपेठांमध्येही खरेदीचा उत्साह दिसून आला. विविध भागांतील दुकाने आणि बाजारपेठांमध्ये गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या साहित्याची मोठी आवक झाली असून, ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी दुकानदारांनीही विविध प्रकारचे साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिक दाखल झाल्याने काही ठिकाणी पार्किंगची समस्या निर्माण झाली.

# भेसळयुक्त पनीर-खव्यावर एफडीएचा पहाटे धडाका; ४ ट्रक माल जप्त!

» पिंपरी | प्रतिनिधी

**गणेशोत्सव आणि आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर भेसळयुक्त अन्नपदार्थांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठी कारवाई केली आहे. कर्नाटकातून पुण्यातील बुधवार पेठेत आणण्यात आलेले संशयित भेसळयुक्त पनीर आणि खव्याचे चार ट्रक एफडीएच्या विशेष पथकाने ताब्यात घेतले. शुक्रवारी पहाटे अत्यंत गोपनीय पद्धतीने करण्यात आलेल्या या कारवाईमुळे दुग्धजन्य पदार्थांच्या विक्री-वितरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**




एफडीएच्या पथकाने जप्त केलेला पनीर आणि खवा तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आला आहे. प्रयोगशाळेच्या अहवालानंतर संबंधित पदार्थ भेसळयुक्त आहेत की नाही, तसेच त्यामध्ये कोणत्या प्रकारची भेसळ करण्यात आली आहे, हे स्पष्ट होणार आहे. त्यानुसार पनीर आणि खवा पाठविणारे पुरवठादार, वाहतूकदार तसेच हा माल मागविणाऱ्या व्यापाऱ्यांविरोधात पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून एफडीएकडून भेसळयुक्त अन्नपदार्थांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. पुणे शहरात परराज्यांसह विविध जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणात पनीर आणि खवा आणला जात असल्याची माहिती एफडीएच्या आयुक्त कार्यालयाला मिळाली होती. या माहितीची गेल्या दहा दिवसांपासून पडताळणी करण्यात येत होती. त्यानंतर विशेष पथकाने बुधवार पेठ परिसरावर लक्ष केंद्रित केले.

शुक्रवारी पहाटे साडेपाच वाजल्यापासून एफडीएच्या पथकाने बुधवार पेठ परिसरात पाळत ठेवली होती. सकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास पनीर आणि खवा घेऊन आलेली वाहने परिसरात दाखल होताच पथकाने ती अडवून तपासणी केली. तपासणीनंतर संबंधित चार वाहने ताब्यात घेण्यात आली. या कारवाईत मोठ्या प्रमाणात पनीर आणि खवा आढळून आल्याने एफडीएच्या अधिकाऱ्यांनी संपूर्ण साठा जप्त केला.

या कारवाईत २७ लाख ८३ हजार रुपये किमतीचे १२ हजार ५०० किलो पनीर, तर ११ लाख ६० हजार रुपये किमतीचा ४ हजार ६०० किलो खवा जप्त करण्यात आला. हे पनीर कर्नाटकातून, तर खवा बार्शी येथून पुण्यात आणण्यात आला होता. जप्त करण्यात आलेल्या पनीरमध्ये तीन वेगवेगळ्या प्रकारांचा समावेश असल्याची माहिती एफडीएचे सहायक आयुक्त नीलेश मसारे यांनी दिली.

जप्त केलेल्या पनीर आणि खव्याचे पॅकिंगही योग्य पद्धतीने करण्यात आले नसल्याचे तपासणीदरम्यान आढळून आले. त्यामुळे अन्नपदार्थांच्या सुरक्षिततेबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. एफडीएकडून जप्त करण्यात आलेला साठा नष्ट करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

बुधवार पेठेत मोठ्या प्रमाणात येणारे पनीर आणि खवा पुणे शहरासह जिल्ह्यातील विविध भागांमध्ये वितरित केला जात असल्याची माहिती एफडीएला मिळाली आहे. त्यामुळे केवळ माल जप्त करण्यापुरतीच कारवाई मर्यादित न ठेवता, या साठ्याची खरेदी-विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांचीही चौकशी केली जाणार आहे.

जप्त करण्यात आलेले पनीर शहरातील २५ ते ३० व्यापाऱ्यांनी, तर खवा ३० ते ३५ व्यापाऱ्यांनी मागविल्याची प्राथमिक माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. त्यामुळे आता या सर्व व्यापाऱ्यांकडून माल कोठून मागविण्यात आला, कोणत्या पुरवठादाराकडून खरेदी करण्यात आली, किती प्रमाणात माल मागविण्यात आला आणि तो शहरातील कोणत्या भागात वितरित करण्यात आला, याची माहिती घेतली जाणार आहे.

एफडीएकडून संबंधित व्यापाऱ्यांची खरेदीची बिले, पुरवठ्याची कागदपत्रे आणि इतर आवश्यक नोंदी तपासण्यात येणार आहेत. पनीर व खव्याच्या पुरवठा साखळीचा माग काढून मालाचा मूळ स्रोत शोधण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जाणार आहे.